# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/11/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. बोरी :— अंतर्गत मौजा एमआयडीसी चौक बोरी येथे दिनांक १५/११/२०२३ चे १५.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— निखील पांडुरंगजी मुळे, वय ३० वर्ष, रा. सालईधाबा ता. हिंगणा जि. नागपुर हे दिनांक १५/११/२०२३ रोजी दुपारी ०३/०० वा. दरम्यान स्वत:च्या मालकीची असलेली एच. एफ डिलक्स मोटरसायकल क्र. एम. एच—४०/ए. एफ—६८८८ हि गाडी एम.आय.डी.सी चौक इसाफ बॅक समोर हॅन्डल लॉक करून उभी करून स्टार बस मध्ये बसुन नागपुरला गेले सायंकाळी ०७/०० वा. नागपुर वरून बोरी येथे परत आले. मोटरसायकल घेण्यासाठी एम.आय.डी.सी चौकात असलेली इसाफ बॅक येथे गेले परंतु फिर्यादी यांची मोटरसायकल तेथे दिसली नाही. फिर्यादिचे मालकीची एच. एफ डिलक्स मोटरसायकल क्र. एम.एच—४०/ए. एफ—६८८८ किंमती २५,०००/—रू ती गाडी कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करून नेली असावी संशय आल्याने त्या गाडीचा बोरी परीसरात मार्केट, एम.आय.डी.सी चौक परीसरात शोध घेतला गाडी सापडली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चव्हान मो. नं. ७४९९६०४६७२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर